# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**शासनाच्या नदीजोड प्रकल्पांबाबत**

**(१) १६४८५ (१४-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नदीजोड प्रकल्पांतर्गत नर्मदा नदी वरील सरदार सरोवरच्या खालच्या बाजूने गुजरातकडे जाणा-या लिंगसाठी ५७ टी एम सी पाण्याची गरज भासते त्यापैकी महाराष्ट्राचे हक्काचे २१ टी एम सी पाणी वापरले जाणार असल्याने गोदावरी, तापी खो-यांची तूट पूर्ण होऊ शकणार नसल्याने खो-यातील बांधकाम सर्वेक्षण, सर्वेक्षणाधिक उपाययोजना यांच्यासाठी भविष्यात पाणी उपलब्ध होणार नाही तसेच महाराष्ट्रासह राज्यातील २५ टक्के क्षेत्रावर पाण्याचे दुर्भिक्ष्य ओढावणार असल्याचे माहे मे, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबतील काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय तसेच या नदीजोड प्रकल्पाद्वारे खान्देशात अतिरिक्त पाणी मिळणार आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्यास या प्रकल्पाद्वारे अतिरिक्त पाणी मिळण्याच्या दृष्टीने शासन कार्यवाही करणार असल्यास त्याचा तपशील काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) महाराष्ट्र - गुजरात राज्य व केंद्र सरकार यांचे सोबत दिनांक ०३/०५/२०१० सांमजस करार झाला आहे. सदर करारानुसार पार-तापी-नर्मदा नदी जोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल राष्ट्रीय जलविकास अभिकरणामार्फत तयार करण्यात आलेला आहे. या अहवालाची छाननी महासंचालक मेरी यांचे मार्फत करण्यात येत आहे.

(२) पार-तापी-नर्मदा नदी जोड योजनेसाठी उपलब्ध पाण्याचे परिणाम निश्चित झाल्यानंतर तसेच सर्वेक्षणाअंती याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

(३) महाराष्ट्रातील पश्चिम वाहिनी नार पार औरंगाअंबिका या उपखोऱ्यात स्थानिक वापर वजा जाता उपलब्ध होणारे पाणी पूर्वेकडील गिरणा व गोदावरी उपखोऱ्यात उपसा जोड योजनेद्वारे वळविण्याचे विचाराधीन आहे. सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणाच्या कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे जिल्हयातील अक्कलपाडा प्रकल्पबाधीत शेतक-यांना मोबदला मिळण्याबाबत

**(२) १६४९५ (१७-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील अक्कलपाडा प्रकल्पाच्या डाव्या कालव्यातील ० ते १ टप्प्यांचा मुख्य अडसर दूर झाला असून प्रकल्पबाधीत शेतक-यांना सुमारे ४२ लक्ष ७७ हजार एवढा मोबदला मंजूर झाला असून या डाव्या कालव्याचे काम लवकरात लवकर सुरु होण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी केली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत काय व त्याचा तपशील काय आहे,
(३) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१५) :**(१) माहे मे २०१५ वा त्या दरम्यान लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त नाही.
(२) व (३) डावा कालवा किमी ० ते १ मधील शेतमालकांच्या मागणीनुसार दि. १२.०५.२०१५ रोजीच्या भुसंपादनाच्या अंतिम निवाडयानुसार रु. ४४.०० लक्ष रकमेचा धनादेश, महसूल विभागास दिला आहे.

धरण ते अक्कलपाडा गांव व अक्कलपाडा गांव ते.रा.मा.क्र. ६ या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याशिवाय उक्त नमुद डाव्या कालव्याचे काम न करु देण्याची भूमिका गावकऱ्यांनी घेऊन काम बंद पाडले आहे. सदर काम सुरु होणेकरीता, गावकऱ्यांशी चर्चा करुन मार्गी लावणेसाठी क्षेत्रीय मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांनी माहे जुलै २०१५ मध्ये कार्यक्षेत्रावर प्रत्यक्ष भेट दिली आहे.

---

### सोलापूर जिल्हयातील उजनी प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादनामुळे विस्थापित झालेल्या ४४ गावांना सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या नसल्याबाबत

**(३) १६५३४ (१४-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील उजनी प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादनामुळे विस्थापित झालेल्या ४४ गावांना सर्व सोयीसुविधा अद्यापपर्यंत पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) प्रकल्पग्रस्त राहावयास आलेल्या ५८ पुनर्वसित गावठाणातील उर्वरित एकूण ३६१ नागरी सुविधा पूर्ण करण्यासाठीचा मूळ आराखडा विभागीय आयुक्त, पुणे यांच्या दि. २८.४.२०१४ च्या पत्रान्वये मदत व पुनर्वसन विभागाकडे सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या प्रलंबित असल्याबाबत

**(४) १६५३६ (१४-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न गेली ४० वर्षे प्रलंबित असूनही प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे क्षमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखाली दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी प्रकल्पग्रस्तांनी उजनी धरणाचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित प्रकल्पग्रस्ताचे दिर्घकालीन प्रलंबित असलेले प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.
(२) प्रकल्पग्रस्त राहावयास आलेल्या ६३ पुनर्वसित गावठाण्यातील उर्वरित ४०९ नागरी सुविधा पूर्ण करण्यासाठीचा मूळ आराखडा विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून दि. २८.४.२०१४ च्या पत्रान्वये मदत व पुनर्वसन विभागाकडे सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर येथील टाकळी येथे चार पंपातून उपसा व चिंचपूर बंधा-याची प्लेट तुटुन पाणी वाहून गेल्यामुळे निर्माण झालेली पाणी टंचाई

**(५) १६५६० (१७-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील टाकळी येथे चार पंपातून उपसा व चिंचपूर बंधा-याची प्लेट तुटुन पाणी वाढून गेल्यामुळे सोलापूरकरांवर पाणी टंचाईचे संकट उभे राहणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूरमध्ये पाणी टंचाई दूर करण्यासाठी येथील भिमानदीत पाणी सोडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) व (२) नाही.

दिनांक १७-५-२०१५ ते २३-०५-२०१५ या कालावधीत तसेच दि. २२.७.२१५ ते दि.२५.७.२०१५ या कालावधीत महानगरपालिकेस पाणी पूरवठा करणाऱ्या औज बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यातील पौट प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(६) १६७०२ (१४-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यातील पौट प्रकल्पामुळे ३५ गावांचा व शेतीच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सुटेल तसेच या पौट साठवण प्रकल्पामध्ये पावसाच्या पाण्याबरोबर म्हैसाळ योजनेचे पाणी येऊ शकते. तसेच मोठ्या प्रमाणात सिंचन वाढणार असल्यामुळे या प्रकल्पाचे काम तातडीने व जलदगतीने होण्यासाठी तेथील मा.स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी संबंधिताकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही सदर प्रकल्पाचे काम अद्यापी पूर्ण करण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरू करून ते पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) पौट प्रकल्पाचे काम अद्यापी सुरु झालेले नाही.

(२) व (३) प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत प्रयत्न करण्यात आले. परंतु बाधित शेतक-यांनी प्रकल्पास व भूसंपादनास विरोध केला असल्यामुळे प्रत्यक्षात काम सुरु करता आले नाही.

---

### विदर्भातील सिंचन प्रकल्पाकडे होत असलेले दुर्लक्ष

**(७) १७००७ (१७-०८-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भात भरपूर जलसाठा असतानाही हा प्रदेश कोरडवाहू शेतीसाठी ओळखला जातोय तसेच विदर्भ प्रदेश गोदावरी व तापी नदीच्या खोऱ्यांतर्गत येतो या दोन्ही नद्यांची जलक्षमता अनुक्रमे ६७८ व ९५ टीएमसी असुन या पाण्याचा योग्य उपसा केल्यास ३८ लाख हेक्टर शेती सिंचनाखाली आणली जाऊ शकत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असुनही मागील काही दशकापासून विदर्भातील सिंचन प्रकल्पाकडे

जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे यामुळे असंख्य शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत परंतु अद्यापही याबाबत उचित कार्यवाही करण्यात आली नसल्याने लोकनायक खापुजी ठाणे स्मारक समिती, जनमंच, भारतीय किसान संघ, स्वदेशी जलागणरण मंच व वेद कौन्सिल यांच्या विद्यमाने दिनांक ३० एप्रिल, २०१५ पासुन शोधयात्रा काढण्यात येत आहे हे पाहता शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

विदर्भातील गोदावरी खोऱ्यात ६३७ अब्ज घनफुट व तापी खोऱ्यात ६७ अब्ज घनफुट पाणी उपलब्ध आहे. जून २०१५ अखेर ११.६१५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली असून बांधकामाधीन प्रकल्पातून आणखी सुमारे ११ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

(२) विदर्भात ७८८ प्रकल्प पुर्ण झालेले असून ३१४ बांधकामाधीन प्रकल्पांपैकी ९९ प्रकल्प जवळपास पूर्ण झालेले आहे. ३१ प्रकल्प वनजमिनीमुळे अडलेले आहेत. उर्वरित प्रकल्पांची कामे अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश यानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार व भुसंपादन, वनजमिन, पुनर्वसन, स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध, इत्यादी अडचणी दुर करुन पूर्ण करणेसाठी शासन प्रयत्नशील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इस्त्रालय तंत्रज्ञानाच्या आधारे पाणी बचतीचा डेहाणी उपसा सिंचन प्रकल्पाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(८) १७०३१ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इस्त्रायली तंत्रज्ञानाचा पाणी बचतीचा बेंबळा धरणावर होत असलेल्या डेहाणी उपसा सिंचन प्रकल्पाच्या ४११ कोटी रुपयांच्या निधीचा पुरवठा न झाल्यामुळे सन २०१३ पर्यंत पूर्ण होणारा प्रकल्प निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे प्रकल्प खर्चात वाढ झाली असल्याने आणखी ३० कोटींची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकल्पामुळे सुमारे ६ लाख ९६८ हेक्टर क्षेत्रात सिंचन होणार असून वर्षभर सलग १६ तास पीकासाठी पाणी उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकल्पामुळे पाण्याचा मोठा अपव्यय टाळता येणार असला तरी, निधी अभावी प्रकल्पपूर्ण होण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पाचा पूरेसा निधी देऊन तो तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पाच्या तृतीय सु.प्र.मा.मंजूर प्रस्तावामध्ये डेहणी उपसा सिंचन योजनेसाठी रु.४११ कोटी ची तरतूद असून जून-२०१५ अखेर योजनेवर रु.३५३.७७ कोटी इतका खर्च झालेला आहे. सदर योजना जून- २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजीत असून त्यासाठी रु.६५.८४ कोटी निधी आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

योजनेचे एकूण लाभक्षेत्र ६९६८ हे. इतके असून मंजूर संकल्पनानुसार त्याची विभागणी ५७ भागांमध्ये करण्यात आली आहे. प्रत्येक भागामध्ये १६ उपभागाची विभागणी केलेल्या क्षेत्रावर पाळीपत्रकानुसार प्रत्येकी एक तास अठरा मिनिटे प्रतिदिन या प्रमाणे पिकांसाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सदर योजना ही बंद पाईप लाईनद्वारे ठिबक सिंचन पध्दतीवर पूर्णत: संकल्पीत असल्याने पाण्याचा उपव्यय टाळत येणार आहे. तथापि, आवश्यकतेनुसार केंद्र शासनाकडून वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत अपेक्षित निधी मिळालेला नसल्याने व विमोचकाच्या पुढे लाभधारकांनी ठिबक सिंचन संच न बसविल्याबाबत योजना पूर्ण होण्यास विलंब होत आहे.

(४) बेंबळा प्रकल्प निधी उपलब्धतेनुसार पुढील तीन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्याप्रमाणे डेहणी उपसा सिंचन योजनेचे काम पुढील दोन वर्षात (जून-२०१७) पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील लघुपाटबंधारे योजना व बॅरेजेसची कामे सुधारीत प्रशासकीय मान्यते अभावी बंद असल्याबाबत**

**(९) १७२७८ (१७-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील मालेगांव, रिसोड व वाशिम तालुका अंतर्गतच्या लघुपाटबंधारे योजना व बॅरेजेसची कामे गत ४ वर्षापासून सुधारीत प्रशासकिय मान्यते अभावी बंद आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारीत प्रशासकीय मान्यते अभावामुळे शेतक-यांच्या जमिनीच्या भुसंपादनाची रक्कम शेतक-यांना मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील लघुपाटबंधारे योजना व बॅरेजेसची कामे ही ६० ते ८० टक्क्यापर्यंत पुर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, वाशिम जिल्ह्यातील लघुपाटबंधारे योजना व बॅरेजेसची कामे पुर्ण करण्याकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही. या प्रादेशिक कार्यालयांतर्गत वाशिम जिल्ह्यातील ३३ ल.पा.योजनांचे सुप्रमा शासनास सादर करण्यात आले होते त्यापैकी१० प्रकल्पांना सुप्रमा २०१५ मध्ये प्रदान करण्यात आली आहे. सुप्रमा प्रकल्पाचे काम प्रभावीत न होण्यासाठी २०१३-१४ करिता उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत मंजूर प्रमा/सुप्रमा पेक्षा जास्त खर्च करण्याची परवानगी दिली आहे.

(२) हे खरे नाही.

भुसंपादन करताना सरळ खरेदीच्या वेळीच संबंधित शेतकऱ्यांना संपुर्ण मोबदला अदा करण्यात आला आहे. ज्या कास्तकारांच्या जमीन सरळ खरेदीस संमती नाही अशा जमिनीचे भुसंपादन कायद्यानुसार संपादनाच्या कायद्यानुसार संपादनाच्या प्रक्रियेत आहेत. त्यानुसार मोबदला वेळोवेळी भुसंपादन यंत्रणेकडे जमा करण्यात आला आहे.

(३) १५ ल.पा. योजनांचे बांधकाम १००% पुर्ण झाले आहे. २८ ल.पा. योजनांचे बांधकाम ६०% ते ८०% दरम्यान काम पूर्ण झाले आहे.

(४) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या दि. १० मार्च, २०१५ रोजी निर्गमित निदेशातील कलम १५ नुसार सुप्रमा प्रकल्पांची कामे गतीमान होण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)जसं(आ) दि.०९.०९.२०१५ अन्वये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांना देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यामध्ये डिंभे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यांतून पाणी सोडल्यानंतर कालव्याच्या भरावातून पाणी झिरपत असल्याबाबत**

**(१०) १७६८२ (१४-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यामध्ये डिंभे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यांतून पाणी सोडल्यानंतर कालव्याच्या भरावातून मोठ्या प्रमाणात पाणी झिरपत असल्याने रोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत या डाव्या कालव्याचे क्रॉक्रिटचे अस्तरीकरण ठिकठिकाणी खचले असून पाणी वाहण्याच्या दृष्टीने हा कालवा धोकादायक बनला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाटबंधारे विभागाने या कालव्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने पाणी वाचविण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली

वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे

डिंभे धरणाचा डावा कालवा हा कंटूर कालवा आहे. कालव्याच्या एका बाजूस उंच डोंगर व दुसऱ्या बाजूस खोल दरी आहे. कालव्याच्या काही भागातील तळ हा सच्छिद्र भूस्तरातून जातो. डिभे कालव्यातून सतत प्रवाह असतो त्यामुळे अस्तीकरण खराब झाले असल्यामुळे या कालव्यातून पाझर होत आहे.

डिंभे उजव्या कालव्यावरील अस्तरीकरण टप्प्या टप्प्यात पूर्ण झाली असून उर्वरित कामे करावयाची आहेत. त्यामुळे पाझर दिसून येतो.

(२) नाही. डिंभे कालवा हा सतत चालू असल्याने व खोल खोदाईच्या ठिकाणी कालव्याच्या कडा कोसळून अस्तरीकरणाचे नुकसान झाले आहे.

(३) नाही.

डिंभे डाव्या कालव्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर चालू आहे.

(४) डिभे हा कुकडी प्रकल्पाचा एक भाग आहे. डिंभे उजव्या कालव्याची अस्तरीकरणाची मुळ कामे शिल्लक आहेत.

डिंभे उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणाची मुळ कामे कुकडी प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भाटघर धरणातून चालू असलेले पाण्याचे आवर्तन बंद करण्याबाबत**

**(११) १७७३२ (१७-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाटघर धरणातून सुमारे ५०००० लोकसंख्येला दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी पर्यंत पुरेसा पिण्याचा पाणीसाठा ठेवण्यात यावा व धरणातून चालू असलेले पाण्याचे आवर्तन तात्काळ बंद करण्यात यावे असे लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) व (२) होय.

नीरा खो-यामध्ये भाटघर, नीरा देवघर, गुंजवणी व वीर ही धरणे बांधण्यात आली आहेत. नीरा कालवे प्रणालीच्या उन्हाळी हंगामातील नियोजनानुसार भाटघर धरणातील पाणी दिनांक ३१ मे, २०१५ रोजी बंद करण्यात आले आहे. उर्वरित कालावधीसाठी भाटघर जलाशयावर अवलंबून असणा-या पिण्याच्या योजनांसाठी आवश्यक साठा १२.०० द.ल.घ.फू.

असून प्रत्यक्षात धरणात ७१५.०० द.ल.घ.फू. पाणी साठा शिल्लक होता.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील कुंद्राळा मध्यम प्रकल्पांतर्गत चालू असलेल्या कॅनॉल दुरुस्तीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१२) १८१९६ (१४-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील कुंद्राळा मध्यम प्रकल्पांतर्गत चालू असलेल्या कॅनॉल दुरुस्तीचे काम अद्याप पूर्णही झालेले नसताना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पडलेल्या पावसामुळे झालेल्या कामापैकी बहुतांश ठिकाणी कॅनॉल फुटले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई - गोवा महामार्गावरील भरणे येथे जगबुडी नदीवरील बंधाऱ्याच्या पुर्नबांधणीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(१३) १८२११ (१७-०८-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील भरणे येथे जगबुडी नदीवरील बंधा-याच्या पूर्नबांधणीला निधी मंजूर होवून माहे एप्रिल, २०१५ अखेर बांधकामाला सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे

काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर बंधा-याच्या पुर्नबांधणीचे काम तातडीने करुन सदर परिसरातील नागरीकांची पाण्याची समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१), (२) व (३) हे अंशतः खरे आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रु.१.७५६८ कोटी इतका निधी मंजूर आहे. अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रत्यक्ष काम सुरु करण्याचे नियोजन होते. दरम्यानच्या काळात जलसंपदा विभागाच्या दरसूची मध्ये बदल झाल्याने बंधा-यांचे सुधारीत अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास प्राप्त झाले असून शासन स्तरावर पुढील कार्यवाही चालु आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन ही कामे हाती घेण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव तालुक्यातील (जि.पुणे) डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यातून गिरवली गाव व परिसरातील अनेक गावातून होत असलेल्या पाणी चोरीबाबत**

**(१४) १८८५५ (१७-०८-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव तालुक्यातील (जि.पुणे) डिंभे धरणाच्या डाव्या कालव्यातून गिरवली गाव व परिसरातील अनेक गावातून पाणी चोरीचे प्रकार प्रकल्प विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने सुरु आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कुकडी विभागाचे उपअभियंता, शाखा अभियंता व कॅनॉल मुकादम दुर्लक्ष करीत असल्याबाबतची तक्रार संबंधित विभागाचे नारायणगाव येथील कार्यकारी अभियंता यांचेकडे ग्रामस्थानी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) नाही.
(२) या संदर्भात मौजे गिरवली ता.आंबेगाव जि.पुणे येथील एक ग्रामास्थ श्री. दत्तात्रय बंडू सैद यांनी दि. ०७.०४.२०१५ रोजी लेखी तक्रार दिली आहे.
(३) उपरोक्त तक्रार अर्जानुसार संबंधित विभागीय कार्यालयाने प्रत्यक्ष पहाणी केली असता कोणतीही पाणी चोरी होत असल्याचे निदर्शनास आले नाही. या बाबत तक्रारदार श्री.दत्तात्रय

बंडू सैद मौजे गिरवली ता. आंबेगाव जि.पुणे यांना पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिधुदुर्ग जिल्हयातील बांदा-सटमट कालव्याच्या साफसफाईबाबत**

**(१५) १९४९१ (१४-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील बांदा-सटमट कालव्यांतून पाणी सोडण्यात आले मात्र पाणी सोडण्यापूर्वी कालव्याची आवश्यक साफसफाई न झाल्याने पाण्याचा प्रवाह मंदावला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कालव्यातून काही ठिकाणी पाणी बाहेर पडल्याने परिसरातील विहिरी तुडुंब भरल्या आहेत तर काही शेतक-यांची भातशेती धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तिलारी कालवा विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे शेतक-यांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, तदनूसार काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

बांदा शाखा कालव्यात काही प्रमाणात झाडेझुडपे व गाळ साठला आहे. कालव्यांच्या वहन क्षमतेच्या चाचणीसाठी अल्प प्रमाणात पाणी सोडण्यात आले होते.
(२) हे अंशत: खरे आहे.

कोकणातील भौगोलिक परिस्थितीमुळे व जादा पाझराच्या भूस्तरामुळे कालव्यातून पाणी पाझरण्याचे प्रकार सर्वत्र आढळतात. त्यानुसार बांदा शाखा कालव्यातून अल्प प्रमाणात पाझर झाल्याचे आढळून आले, तथापि, मोठया प्रमाणात पाझर होऊन भातशेती धोक्यात आल्याचे व विहिरी तुडूंब भरल्याची घटना घडलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल परिसरातील (जि.रायगड) मोरबे धरणाची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१६) १९७९७ (१४-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल परिसरातील (जि.रायगड) मोरबे धरणाला ठिकठिकाणी तडे गेले असून धरणाचे पाणी अडविण्यासाठी बांधलेल्या दगडी भिंतीची अवस्था दयनीय झाल्याचे माहे एप्रिल, २०१५

मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धरणाच्या डागडुजी करण्याकडे प्रशासनातील अधिकारी वर्ग हेतुपुरस्पर दुर्लक्ष करीत असल्याने दररोज पाणी वाया जात आहे तसेच या धरणाच्या जागेत सुरुंग लावून दगड नेले जात असतानाही पाटबंधारे विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असल्याने या दोन्ही कारणामुळे आसपासच्या ग्रामस्थांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्यामुळे मोरबे धरणाची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

मात्र दगडी धरणातून काही ठिकाणी गळती होत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०१४ मध्ये काही प्रमाणात सिमेंट ग्राउटींग करुन धरणातील गळती कमी केली आहे. धरण परिसरात सुरुंग लावले जात नाहीत. त्यामुळे धरणास धोका होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) हतनूर भूकंप तीव्रता मोजणी (भूकंपालेख) यंत्र बंद असल्याबाबत**

**(१७) १९९९३ (१७-०८-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) हतनूर भूकंप तीव्रता मोजणी (भूकंपालेख) यंत्र दिनांक १६ एप्रिल, २०१५ रोजीपासून बंद पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे यंत्र नादुरुस्त असल्याबाबतचे दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजीच्या सुमारास पाटबंधारे विभागाने मेरी संस्थेला कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असे असून अद्यापही या यंत्राची दुरुस्ती करण्यात आली नाही यांची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, यांस जबाबदार असणाऱ्यावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) होय.

(२) होय.

(३) दि.११/८/२०१५ पासून यंत्र दुरुस्त करुन पुनश्च प्रकल्पस्थळी व्यवस्थित कार्यान्वित झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिलारी जलसंपदा विभागाच्या ताब्यात असलेल्या व कोल्हापूर-बेळगाव-गोवा-हुबळी यांना जवळचा मार्ग म्हणून अस्तित्वात असलेल्या तिलारी घाटात वाढत असलेल्या अपघाताबाबत**

**(१८) २००५२ (१४-०८-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी जलसंपदा विभागाच्या ताब्यात असलेल्या व कोल्हापूर-बेळगाव-गोवा-हुबळी यांना जवळचा मार्ग म्हणून अस्तित्वात असलेल्या तिलारी घाट रस्त्याच्या ७ किमी लांबीच्या असून अत्यंत धोकादायक व जड उतार असलेला संपूर्णतः निकामी होऊन वाहतूकीस मृत्यूचा सापळा बनला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदरहू घाट रस्ता अत्यंत धोकादायक व जड उताराचा असल्याने मागील काही वर्षात या घाटात अनेक अपघात होवून अनेकांचे बळी व अन्य मालमत्तेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) पावसाळ्यापूर्वी या घाटाची दुरुस्ती न झाल्यास प्रवासांच्या जिवितांस धोका होवू नये याची दखल घेवून या घाटातील वाहतूक पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय एसटी आगाराने घेतल्यामुळे प्रवाश्यांची गैरसोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तिलारी घाट रस्ता त्वरीत दुरुस्त करण्यात यावा अशी मागणी त्यापरिसरातील जनतेने मागील ६ ते ८ वर्षापासून सातत्याने कार्यकारी अभियंता, तिलारी, जलसंपदा विभाग, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा.जलसंपदामंत्री आदीकडे लेखी निवेदनाद्वारे करण्यात आलेली असतानाही आजमितीस यांची कुठल्याही प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू धोकादायक व वाहतूकीस अयोग्य असलेल्या तिलारी घाट रस्त्यांची विनाविलंब दुरुस्ती व डांबरीकरण होण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे.

सदर रस्ता सार्वजनिक वाहतुकीसाठी बांधला नव्हता, हा रस्ता प्रकल्पाला बांधकामासाठी बांधला होता. प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. रस्त्यास उतार तीव्र आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(३) हे खरे नाही. कार्यकारी अभियंता, तिलारी शीर्षकामे विभाग क्र. १ कोनाळकट्टा यांनी दि.२२.५.२०१५ च्या पत्रान्वये विभागीय नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, सिंधुदुर्ग विभाग तसेच कोल्हापूर विभाग यांना दि.२७.५.२०१५ पासून दुरुस्तीसाठी घाटरस्ता बंद करणार असल्याबाबत कळविले होते. त्यानुसार गाड्यांच्या फेऱ्या बंद होत्या. सद्य:स्थितीत दि.१०.७.२०१५ पासून घाटरस्ता वाहतुकीसाठी सुरु केलेला आहे.

(४) हे खरे नाही. जलसंपदा विभागास रस्ता देखभालीसाठी स्वतंत्र निधी मिळत नाही. तिलारी जलविद्युत प्रकल्प टप्पा-१ साठी २८०१ या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून घाट रस्त्याची आवश्यक दुरुस्ती करण्यात येत असते. सद्य:स्थितीत दि.१०.७.२०१५ पासून एस.टी. वाहतुकीसह सर्व प्रकारची वाहतूक सुरु आहे.

(५) सदर रस्ता आता प्रकल्प बांधकामासाठी उपयोगात नसून सार्वजनिक वाहतुकीसाठी उपयोगात आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तो हस्तांतरीत करुन घेऊन त्याची देखभाल करणे अभिप्रेत आहे. तशी विनंती सार्वजनिक बांधकाम विभागास करणेत आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाळगंगा (ता.पेण, जि.रायगड) धरण प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत**

**(१९) २०१२१ (१४-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळगंगा (ता.पेण, जि.रायगड) धरण प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत दिरंगाई करीत असल्याने प्रकल्पाग्रस्तांनी दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी प्रांत कार्यालय, पेण येथे मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणाचे काम ८० टक्के पूर्ण होऊनही शासन प्रकल्पग्रस्तांकडे दुर्लक्ष करीत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात आधी पुर्नवसन आणि मग धरण असा नियम आहे मात्रा रायगड जिल्ह्यात पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु करण्याआधीच बाळगंगा धरणाचे ८५ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे या धरणासाठी १३ गांवामधील १०५५ हेक्टर जमीन संपादीत केली जाणार आहे धरणामुळे ३०२४ कुटूंबातील जवळपास साडेसात हजार लोक विस्थापित होणार आहे हे पाहता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.
दि.२८/०४/२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल) पेण यांच्या कार्यालयावर प्रकल्पग्रस्त तर्फे मोर्चा नेण्यात आला होता.
(२) व (३) हे खरे नाही,

प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाल्यानंतरच धरणाच्या घळभरणीचे काम हाती घेण्यात यावे असे धोरण आहे. बाळगंगा धरणाच्या नदीच्या दोन्ही तीरा वरील मातीकाम ६५ टक्के पूर्ण झाले आहे. बाळगंगा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी १३ गावामधील ११३२.२० हे. खाजगी जमीन, ३६१.७६३ हे. वन जमीन अशी एकूण १४९३.९६ हेक्टर जमीन आवश्यक आहे. खाजगी जमीन संपादनामुळे ३४४३ कुटूंबाचे विस्थापित होणार आहे.

बुडीत क्षेत्रातील तसेच पुनर्वसिन गावठाणासाठी संपादन करावयाच्या जमिनीचे अंतिम निवाडे झाले आहेत. भुसंपदान मोबदला अदा करण्यासाठी महसूल विभागास रु.५९९.९२ कोटी निधी वर्ग केला आहे.

(४) बाधित गावठाणातील एकूण ३४४३ कुटूंबाचे पुनर्वसन ७ प्रस्तावित पुनर्वसन गावठाणात करण्याचे नियोजित आहे. पुनर्वसन गावठाणासाठी भुसंपादन प्रक्रिया सुरु आहे.

बाळगंगा प्रकल्पाचा महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९, लाभक्षेत्र नसलेले पाटबंधारे प्रकल्पासाठीचा दि.१७/०४/२००६ या शासन निर्णय व राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००७ या सर्वांचा विचार करुन रु.५१६.१७ कोटी रकमेचा पुनर्वसन आराखडा महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि.४/५/२०११ रोजी संपन्न झालेल्या १२ व्या बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. सदर आराखड्यास सिडको बोर्डानेही मान्यता दिलेली आहे.

पुनर्वसन गावठाणाची जमीन ताब्यात मिळाल्यानंतर नागरी सुविधेची कामे केली जातील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कार्यान्वित असलेली धरणे व तलाव यातील गाळ काढण्याबाबत**

**(२०) २०१४४ (१४-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कार्यान्वित असलेली धरणे व तलाव यातील गाळ न काढल्याने पाण्याची पातळी कमी होत असल्याचे महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन केंद्र नाशिक (मेरी) यांचेकडून १० टक्कांपेक्षा अधिक गाळ साचल्याने पाण्याची पातळी कमी होऊन पाणी पुरवठा टंचाई निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन पाणी पुरवठा करणाऱ्या तलावातील गाळ काढण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) नाही.

धरणांच्या संकल्पनात धरणांच्या आयुष्यात येणारा गाळ साठविण्याची तरतूद करुन अचलसाठा क्षमता निश्चित केली जाते. मेरी संस्थेने अभ्यास केलेल्या जलाशयांमध्ये आलेला सरासरी गाळ १० टक्यांपेक्षा कमी आहे.मेरी, नाशिक यांनी ८६ धरणातील केलेल्या सर्वेक्षणानूसार धरणातील पाणीसाठा ८.१६ टक्क्यांनी कमी झाला आहे. त्यामुळे मेरी संस्थेने अभ्यास केलेल्या धरणात १० टक्यांपेक्षा अधिक गाळ साचल्याने पाणी पातळी कमी होऊन पाणी टंचाई निर्माण झाली हे म्हणणे योग्य नाही.

(२) जलसंपदा प्रकल्पातील गाळ काढणे ही बाब आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य आहे. तथापि, जलयुक्त शिवार अभियानातंर्गत लोकसहभाग, यांत्रिकी यंत्रसामुग्री, महात्मा फुले जलसंधारण अभियान, ईजीएस, एमआरईजीएस इत्यादी अशा विविध योजनेद्वारे राज्यामध्ये धरणातील गाळ काढण्याचे काम करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील चासकमान धरण प्रकल्पांच्या अंतर्गत पाणी फुगवट्यासाठी बुडीत बंधाऱ्यांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२१) २०५३१ (१४-०८-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील चासकमान धरण प्रकल्पांच्या अंतर्गत पाणी फुगवट्यासाठी बुडीत बंधाऱ्यांच्या कामाचा अंतर्भाव योजना होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती बुडीत बंधारे पूर्ण झाली आहेत व त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) होय.

(२) चासकमान धरणाच्या बुडीत क्षेत्रामध्ये-

१) मौजे-पाबे पूलवजा को.पं.बंधारा व

२) मोजे-डेहणे पूलवजा बंधारा असे दोन बंधारे आहेत. पाबे पूलवजा को.प. बंधा-याचे काम पूर्ण झालेले आहे. डेहाणे पुलवजा बंधा-याची स्थापत्य कामे पूर्ण असून यांत्रिकी विभागाचे गेट बनविण्याचे काम प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गंगेच्या धर्तीवर गोदावरी नदीतील प्रदुषण दूर व स्वच्छ करण्याबाबत**

**(२२) २०६१५ (१४-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगेच्या धर्तीवर गोदावरी नदीतील प्रदुषण दूर करण्याचा व ती स्वच्छ करण्याचा कृती आराखडा तयार करण्याचा निर्णय मा.जलसंपदा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी दिनांक ०८ जानेवारी, २०१५ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी किती निधीची आवश्यकता आहे व तो किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांना आधार देण्याच्या दृष्टीने विविध भागातील सिंचन क्षेत्रात वाढ करण्याच्या निर्णयाबाबत**

**(२३) २१२४३ (१४-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतक-यांना आधार देण्याच्यादृष्टीने विविध भागातील सिंचन क्षेत्रात वाढ करण्याच्या निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचन क्षेत्र वाढविण्याबाबत कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय. अपुर्ण पाटबंधारे प्रकल्पांचे दायित्व मोठे असून अपूर्ण प्रकल्पांबाबत उपाय योजना शासनाचे प्रसिध्द केलेल्या श्वेतपत्रिकेत नमूद करण्यात आली आहे.

(२) अपुर्ण प्रकल्पांचा प्राधान्यक्रम ठरवून ते पूर्ण केले जातीत. असे करतांना प्रकल्प पुर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे. याबाबतचा आढावा घेऊन त्यानुसार प्रकल्पाचा अग्रक्रम ठरविण्यात येईल व या प्राधान्यक्रमानुसार आर्थिक गुंतवणुक केली जाईल. ज्या प्रकल्पापापासून पुढील ३ वर्षात प्रत्यक्ष सिंचन लाभ शेतक-यास मिळू शकेल, अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येईल. मात्र अमरावती प्रदेशातील अनुशेष जिल्ह्यातील प्रकल्पांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

तसेच भूसंपादन प्रक्रियेस गती देणेसाठी दि.१२ मे, २०१५ रोजीच्या शासननिर्णयान्वये सरळ खरेदीचे धोरण निश्चित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाद्वारे गोसीखुर्द प्रकल्पाकरिता जाहिर केलेल्या पॅकेजमधून पुर्णपणे बाधीत गावांना मोबदला देण्याबाबत**

**(२४) २१५१४ (१७-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासनाद्वारे गोसीखुर्द प्रकल्पाकरिता जाहिर केलेल्या पॅकेजमधून पुर्णपणे बाधीत गावांना मोबदला देण्यात आला असून भंडारा जिल्ह्यातील पिंडकेपार व सालेबर्डी या दोन गावांचा पुनर्वसन अनुदान कमी काढण्यात आला असल्याचे माहे जून, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाप्रकारे पुनर्वसन अनुदान कमी काढण्यात आल्याची प्रकरणे शासनाकडे आली आहेत काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांचे हीत लक्षात घेता पुनर्वसन अनुदानाची चौकशी करुन पुनर्मुल्यांकन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१५)** :(१) नाही
(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलडाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(२५) २१६६८ (१४-०८-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलडाणा) येथील ज्ञानगंगा प्रकल्पाचे काम मागील २ वर्षापासून बंद आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे सदर कामे प्रलंबीत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासन पाठपुरावा करणार आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पाचे काम लवकर सुरु करण्याबाबत शासन सुधारीत शासकीय मान्यतेच्या प्रस्तावाला तात्काळ मंजुरी प्रदान करणार आहेत काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) अंशतः खरे आहे.

या प्रकल्पाचे काम सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी जून, २०१२ पासून बंद होते. परंतु शासनाचे पत्र दि.०७.०८.२०१४ अन्वये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात वितरीत झालेल्या तरतूदीच्या मर्यादेत रु.१७.३८ कोटी खर्च करण्यास परवानगी प्रदान केली असल्यामुळे प्रकल्पाचे काम ऑक्टोबर, २०१४ पासून पुन्हा सुरु करण्यात आले आहे.
(२) नाही. सद्यःस्थितीत प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) व (४) राज्यपाल यांचे निदेशानुसार सुप्रमा देण्याचे अधिकार शा.नि.दि.०९.०९.२०१५ नुसार महामंडळास प्रदान करण्यात आले आहेत. त्याप्रमाणे महामंडळस्तरावर कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात ओझरखेडा धरणाचे काम गेल्या तीन वर्षापासून संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(२६) २१७२६ (१४-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यात ओझरखेडा येथे बांधण्यात येणारे ओझरखेडा धरणाचे काम गेल्या तीन वर्षापासून संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओझरखेडा धरणात हतनूरमधून पाणी आणण्यासाठी लागणारी सर्व तयारी झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने धरणाचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे,

(२) अंशत: खरे आहे,

योजनेच्या ओझरखेडा धरण, उपसा प्रणाली व विद्युत पुरवठ्याची कामे ९०% पूर्ण झाली आहेत. भुसंदपादनाच्या अडचणीमुळे उर्वरीत धरणाचे काम मंदगतीने सुरु असुन भूसंपादनाचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

(३), (४) व (५) योजनेच्या घटकभागांची कामे अंतिम टप्प्यात प्रगतीपथावर असुन विलंबाचा अथवा चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोयना धरणात दोन वर्षापूर्वी झालेल्या लेक टॅपिंग च्या कामात झालेला गैरप्रकार**

**(२७) २१७३४ (१७-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणात दोन वर्षापूर्वी झालेल्या लेक टॅपिंग च्या कामात गैरप्रकार झाल्याच्या आरोपाबाबत वरिष्ठ आयएएस अधिकारी नेमून चौकशी करण्याचा आदेश मा.उच्च न्यायालयाने राज्याच्या मुख्य सचिवांना माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कारवाईस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) व (२) होय. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये मुख्य सचिव यांनी श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव यांची नियुक्ती केली. प्रधान सचिव यांनी सदर प्रकरणी तपासणी करुन अहवाल मा.रजिस्टर, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी सादर केला आहे.
(३) व (४) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. दिरंगाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खडकवासला कालव्यातून हवेली, दौंड, इंदापूरला सोडले जाणाऱ्या पाण्यापैकी ३० टक्के पाण्याचा वापर होत असून ७० टक्के पाणी गळती होत असल्याबाबत**

**(२८) २१९२१ (१४-०८-२०१५). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विभागातील खडकवासला कालव्यातून हवेली, दौंड, इंदापूरला सोडले जाणाऱ्या पाण्यापैकी ३० टक्के पाण्याचा वापर होत असून ७० टक्के पाणी गळती होत असल्याबाबतचा अहवाल पाटबंधारे खात्याद्वारे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत असल्यामुळे कालव्याचे नविनीकरण व अस्तरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ३ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गळती रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) नाही,
(२) होय,
(३) गळती रोखण्यासाठी, विभागांतर्गत नविन मुठा उजवा कालवा सा.क्र. ३०/२०० येथील जलसेतू,सा.क्र. ४०/२०० येथील जलसेतू,सा.क्र. १४१/१२० येथील जलसेतू, सा.क्र. १४९/१४० येथील लादीमोरी, सा.क्र. १५६/८०० येथील लादीमोरी, या बांधकामांचे गळती प्रतिबंधक कामे सन २०१३-१४ मध्ये देखभाल व दुरुस्ती निधी अंतर्गत हाती घेवून पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच उर्वरित गळती रोखण्यासाठी कालव्यांची व भरावा दुरुस्ती व बांधकामे दुरुस्ती करणेबाबतचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर शहाराला इरई नदी व इरई धरणामुळे पुराचा धोका निर्माण झाल्याबाबत**

**(२९) २२१५६ (१४-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्षेत्र महाव्यवस्थापक, वेस्टर्न कोलफिल्ड लि.चंद्रपूर एरिया, यांनी दिनांक २० मार्च, २०१५ रोजी Ref-WCL/CHA/AGM/ENV/५७२ अन्वये कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग चंद्रपूर यांना चंद्रपूर शहराजवळून वाहणाऱ्या इरई नदीमुळे शहराला पावसाळ्यात निर्माण होणारा धोका लक्षात घेता व आय.आय.टी. पवई मुंबई यांनी सूचविलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे इरई नदीचा गाळ उपसणे व नदीचे संवर्धन करण्यासाठी दोन कोटी रुपयांचा धनादेश दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग चंद्रपूरच्या कार्यालयाला प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी अंतर्गत कोण-कोणती कामे करण्यात आली आहे, तसेच चंद्रपूर शहराला इरई नदी व इरई धरणामुळे निर्माण होणारा पुराचा धोका टाळण्यासाठी कोणती कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय,

(२) होय,

(३) सदर निधी मधून इरई नदीवरील दाताळा पुल ते चौराळा पुलापर्यंतच्या भागामधील गाळ काही प्रमाणात विभागाच्या यांत्रिकी संघटनेमार्फत काढण्यात आला असून उर्वरीत गाळ काढण्याचे काम पावसाळ्यानंतर सुरु करणे नियोजित आहे. चंद्रपूर शहराला इरई नदी व इरई धरणामुळे निर्माण होणारा पुराचा धोका टाळण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम आय.आय.टी. पवई, मुंबई यांना देण्यात आले असून त्यांच्याकडून मार्गदर्शक सूचना व संकल्पना प्राप्त झाल्यानंतर आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील राहूरी तालुक्यातील मुळा प्रकल्प अंतर्गत नियोजित वाबोंरी पाईप चारी टप्पा-२ या कामासाठी आर्थिक तरतूद होण्याबाबत**

**(३०) २२३८८ (१४-०८-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील राहूरी तालुक्यातील मुळा प्रकल्प अंतर्गत नियोजित वाबोंरी पाईप चारी टप्पा-२ या कामासाठी सन २०१४-१५ मध्ये आर्थिक तरतूद होण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (राहूरी) यांनी मा.अर्थमंत्री यांना दिनांक ६ मार्च, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) होय.

(२) शासन निर्णय जलसंपदा विभाग दि. २०/११/२०११ अन्वये मुळा पाटबंधारे प्रकल्पाच्या रु.२६२.३२ कोटी इतक्या किमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. मुळा प्रकल्पाच्या सहाव्या सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालात वांबोरी चारी टप्पा क्र.२ समाविष्ट करण्यात आलेला असून या करिता रु. ३७.७५ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि वांबोरी चारी टप्पा - २ साठी वांबोरी चारी टप्पा क्र. १ मधून पाणी उचलण्याऐवजी थेट मुळा धरणातून पाणी उचलण्याची लोकप्रतिनिधींची आग्रही मागणी आहे. त्यानुसार सादर सुधारित प्रस्तावाची छाननी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील उर्ध्व प्रवरा उजवा कालव्याच्या कामास निधी मिळण्याबाबत**

**(३१) २२४०० (१४-०८-२०१५). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील उर्ध्व प्रवरा उजवा कालवा कि.मी. १९ ते ८४ मधील कामास निधी मिळावा व कि.मी. ८५ ते ९७ या कामाची निविदा काढण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (राहूरी) यांनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक ६ मार्च २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय,

(२) राज्याची अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपालांचे निदेश यानुसार उपलब्ध होणाऱ्या निधीतून उर्ध्व प्रवरा निळवंडे या योजनेच्या कालव्याच्या कामासाठी सन २०१५-१६ मध्ये रु. ३३.०० कोटीचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. कि.मी. ८५ ते ९७ मधील सर्वेक्षण पूर्ण झाले असून माती काम व बांधकामाचे अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्याच्या वाट्याचे ७ टी.एम.सी. पाणी देण्याबाबत**

**(३२) २२४१५ (१४-०८-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्याच्या वाट्याचे ७ टी.एम.सी. पाणी देण्याबाबतच्या योजनेच्या पुढील कामास केंद्रीय पर्यावर मंत्रालयाची परवानगी घेण्याची शासनाची कार्यवाही चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रस्तावाची स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी मिळून या योजनेचे काम पूर्ण होण्यासाठी काय

कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे,
(२) कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यातील उसिंयो क्र.१ व २ या कामांना केंद्रीय वन व पर्यावरण विभागाच्या दिनांक २४ जुन, २०१५ च्या पत्रान्वये मान्यता दिली आहे याच योजनेच्या बीड जिल्ह्यातील आष्टी उसिंयो क्र. ३ ची पर्यावरण मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) उ.सि.यो.क्र.१ व २ मधील कामे निधीच्या उपलब्धतेनुसार सुरु आहेत. उ.सि.यो.क्र.३ अंतर्गतची कामे पर्यावरण मान्यते अभावी बंद आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीवरील बंधाऱ्यांचे सर्वेक्षण व अन्वेषणाच्या अहावालाबाबत**

**(३३) २२६३८ (१४-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीवरील बंधारे बांधकामासंदर्भात मा.जलसंपदा मंत्री यांचे अध्यक्षतेखाली माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत बंधाऱ्यांचे सर्वेक्षण व अन्वेषण करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बंधाऱ्याचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, सदर सर्वेक्षण व अन्वेषण अहवाल सादर करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, अहवालात काय नमूद करण्यात आले आहे व संबंधित बंधाऱ्यांचे कामास मंजूरी किती कालावधीत देण्यात येईल ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) होय हे खरे आहे ,
(२) प्राथमिक सर्व्हेक्षण करण्यात आले आहे.
(३) प्राथमिक सर्व्हेक्षण पूर्ण केले आहे व सविस्तर सर्व्हेक्षण व अन्वेषणाची कार्यवाही प्रगत आहे.
(४) सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषणावर आधारित अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक निर्णय घेण्यात येईल.

---

**पालघर तालुक्यातील मौजे गांजे ढेकाळे येथील वांद्री धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(३४) २२७९२ (१४-०८-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर तालुक्यातील मौजे गांजे ढेकाळे येथील वांद्री धरणातील गाळ गेल्या ३५ वर्षात एकदाही काढण्यात आलेला नाही सबब सदरहू गाळ काढण्यात आल्यास जास्त पाण्याचा साठा

होऊन त्याचा फायदा आसपासच्या आदिवासी शेतक-यांना होईल या संबंधीचे सविस्तर निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी तत्कालिन जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २००९ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्या काय आहेत व त्या अनुषंगाने सदरहू प्रकरणी कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) होय,

(२) सदर निवेदनात वांद्री धरणाच्या गाळ काढण्याच्या कामाला मान्यता देऊन त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देणेबाबत मागणी करण्यात आली होती.

वांद्री धरणाच्या गाळ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

गाळ किती साचला आहे. याबाबतच्या सर्वेक्षणानंतर उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुलवाडे-जामफळ उपसा जलसिंचन योजनेस मान्यता मिळण्याबाबत**

**(३५) २२८०६ (१४-०८-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुलवाडे-जामफळ उपसा योजनेच्या (ता.शिंदखेडा, जि.धुळे) अंतीम अद्यावत किंमतीस राज्य शासनाच्या वित्त व नियोजन विभागाची मान्यतेसाठी जलसंपदा विभागाने प्रस्ताव पाठविला असून सदरील प्रस्ताव गेल्या वर्षभरापासून वित्त विभागाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुलवाडे जामफळ उपसा जलसिंचन योजनेवर कायमस्वरुपी दुष्काळी असणाऱ्या शिंदखेडा तालुक्यातील ४८ गावांचा सिंचनाचा व पिण्याचा पाण्याचा प्रश्न अवलंबून आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेला वित्त विभागाची मान्यता देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५)** :(१) नाही,

सदर प्रस्ताव नियोजन विभागास सादर करण्यात आला होता. नियोजन विभागाच्या शेऱ्यांची पूर्तता करण्याचे काम प्रगतीत आहे.

(२) सदर योजना पूर्ण झाल्यावर शिंदखेडा तालुक्यातील ४७ गावांतील २६९०७ हेक्टर क्षेत्रास सिंचनास लाभ मिळणार आहे. सदर योजनेच्या जलनियोजनात पिण्याच्या पाण्याची तरतुद नाही.

(३) राज्य वित्त विभागाची सहमती प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तापी खोऱ्यातील निम्न तापी प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३६) २२९७९ (१४-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी खोऱ्यातील निम्न तापी प्रकल्प (पाडळसरे) ह्या प्रकल्पाला १९९५-९६ मध्ये प्रशासकीय मान्यता देतेवेळी या प्रकल्पाचा खर्च १४२ कोटी रुपये इतका होता हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००९-२००९ या प्रशासकीय मान्यतेनुसार हा खर्च रुपये ११२७ कोटी इथपर्यंत पोहचला हे खरे आहे काय,
(३) असल्यास, काम संथगतीने केले गेल्याने धरणाचा खर्च वाढला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाची जळगांव जिल्हयातील सिंचन क्षमतेने अमळनेर पारोळा चोपा व धरणगांव तालुक्यातील ६०,१३९ हेक्टर तर धुळे जिल्हयात ३५१७ हे क्षेत्र भिजले जाणार आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, हा प्रकल्प जलदगतीने पाच वर्षात पूर्ण करण्यासाठी दरवर्षी २०० रुपये कोटीची गरज असतांना सन २०१५-२०१६ मध्ये तरतुद केली गेली, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, यामुळे प्रकल्पाचे काम संथगतीने होऊन प्रकल्प खर्चात वाढ होवू शकते काय,
(७) असल्यास, निम्न तापी प्रकल्पासाठी जास्तीत जास्त निधी मंजूर करुन प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) होय,
(२) होय,

सन २००८-०९ च्या दरसुचीवर आधारीत तृतीय सुधारीत प्रकल्प अहवालाची प्र.मा किंमत रु. ११२७.७४ कोटी असून माहे जुलै, २०१५ अखरे प्रकल्पावर रु.३४५.६५ कोटी इतका खर्च झाला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

अर्थोपायाच्या स्थिती व निदेशानुसार उपलब्ध होणारा निधी तसेच भूसंपादन, पुनर्वसन यासाठी लागणारा कालावधी या बाबींमुळे प्रकल्प बांधकामाचा कालावधी वाढला असून दरसुचीतील वाढीमुळे प्रकल्पाची किंमती वाढणे अपरिहार्य आहे.

(४) होय,
(५) मा.राज्यपाल यांच्या निदेशानुसार विहित पध्दतीनुसार या प्रकल्पात सन २०१५-१३ मध्ये रु. २०.०० कोटीची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे.
(६) होय,

(७) व (८) महामंडळांतर्गत बांधकामाधिन प्रकल्पांसाठी मा.राज्यपालांचे निदेशानुसार व ठरवुन दिलेल्या सुत्रानुसार अर्थसंकल्पाद्वारे अनुज्ञेय निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

---

**नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी तालुक्यातील वाकी खापरी धरणाचे काम ९५ टक्के पुर्ण झाले असतांनाही या प्रकल्पाअंतर्गत धरण ग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(३७) २३१४४ (१४-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील इगतपूरी तालुक्यातील वाकी खापरी धरणाचे काम ९५ टक्के पुर्ण झाले असतांनाही या प्रकल्पाअंतर्गत धरण ग्रस्तांचे पुनर्वसन पुर्ण केलेले नाही तसेच भुसंपादनाचा मोबदला देखील शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत वाकी धरणासाठी एकूण १०२३ हेक्टर क्षेत्र संपादन करावयाची आवश्यकता होती. त्यापैकी ९९६ हेक्टर क्षेत्र जमीनीचे भूसंपादन झालेले असून त्याचा मोबदला संबंधीत शेतकऱ्यांना अदा करण्यात आलेला आहे. उर्वरित २७ हेक्टर क्षेत्राचे संपादन अंतिम टप्प्यात आहे.

भूसंपादन कलम १८/२८ प्रकरणातील व जाहीर निवाड्यांची एकूण प्रलंबीत रक्कम रु.११७०.५८ लक्ष इतकी आहे.

तीन गावांचे पुनर्वसन झाले असून दोन गावांचे पुनर्वसन प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात अनेक प्रकल्पांची कामे अपुर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३८) २३१८८ (१४-०८-२०१५). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात अनेक प्रकल्पांना शासनाने मान्यता देऊनसुध्दा अद्यापही प्रकल्पांची कामे अपुर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) या प्रकल्पांची कामे त्वरित पूर्ण करावी अन्यथा तेथील नागरिक व लोकप्रिनिधी दिनांक १६ जून, २०१५ पासून आमरण उपोषणाला बसणार असल्याबाबत संबंधित लोकप्रितिनिधींनी

दिनांक ६ जून, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्र्यांना पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) सिंचन प्रकल्पाची प्रलंबित कामे त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) अशंत: खरे आहे,
(२) बागलाण तालुक्यातील हरणबारी डावा वाढीव कालवा, तळवाडे भामेर पोहोच कालवा, केळझर चारी क्र.३, पुनंद प्रकल्पांतर्गत सुळे वाढीव कालवा ही कामे मुख्यत्वे भू-संपादना अभावी अपुर्ण आहेत.
(३) होय, हे खरे आहे,
(४) उपोषणास बसु इच्छीणाऱ्या लोकप्रतिनिधी समवेत कार्यकारी संचालक यांनी दिनांक ८ जून, २०१५ रोजी नाशिक येथे बैठक आयोजित करुन कामे पूर्ण करण्याबाबत आवश्यक सुचना सर्व संबंधिताना दिल्या, त्यानुसार कार्यवाही सुरु आहे,

---

**सोलापूर जिल्ह्यातील उजनी डावा कालवा १२४ किलोमीटर तांबोळे गावाच्या हद्दीत क्षमतेपेक्षा जास्त पाणी सोडल्यामुळे कालवा फुटून झालेले नुकसान**

**(३९) २३१९१ (१७-०८-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी डावा कालवा १२४ किलोमीटर तांबोळे गावाच्या हद्दीत क्षमतेपेक्षा जास्त पाणी सोडल्यामुळे दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी फुटला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कालवा फुटल्यामुळे कालव्याच्या आजूबाजूला असलेले शेतीतील पिके, विहिरी, जनावरे व घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे व त्याचप्रमाणे रस्ते वाहून गेले, हे ही खरे आहे काय,
(३) या संबंधात जिल्हाधिकारी सोलापूर व संबंधित पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांना सांगून सुध्दा त्यांनी याकडे दुर्लक्ष करुन अद्यापही आपादग्रस्तांना कोणत्याही स्वरुपाची मदत दिली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आपादग्रस्त शेतक-यांना त्वरीत मदत देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) अशंत: खरे आहे.
कालवा फुटला हे खरे आहे तथापी पाणी जास्त सोडल्यामुळे कालवा फुटला ही बाब खरी नाही.
(२) अंशत: खरे आहे.
कालवा फुटल्यामुळे फक्त पिकांचे व विहिरीचे नुकसान झाले आहे.

(३) व (४) नाही.

आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रस्तावीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा जिल्ह्यातील ६३ प्रकल्पात सरासरी केवळ १०.८५ टक्के पाण्याचा उपयुक्त साठा असल्याबाबत**

**(४०) २३३५१ (१४-०८-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्याची शासनाच्या लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण क्षेत्रात येणाऱ्या लघुपाटबंधारे विभागांतर्गत भंडारा जिल्ह्यातील ६३ प्रकल्पात सरासरी केवळ १०.८५ टक्के पाण्याचा उपयुक्त साठा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाण्याची साठवण पाहता पाण्याचा होत असलेला अपव्यय टाळण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार आहे,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) तसेच सदर जिल्ह्यातील मामा तलावांची खोलीकरण न झाल्यामुळे पाण्याची पात्रता कमी असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासन कोणते प्रयत्न करणार आहे आहे वा करीत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपूर अधिनस्त लघु पाटबंधारे विभागांतर्गत भंडारा जिल्ह्यातील ६३ प्रकल्पात दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी सरासरी ६५.६० टक्के उपयुक्त साठा उपलब्ध होता.

(२) उपलब्ध साठ्याचा प्रचलित शासन धोरणानुसार काटेकोरपणे उपयोग केला जात असून त्यासाठी वितरण प्रणालीवर देखरेख ठेवण्यात येते. त्यामुळे पाण्याचा अपव्यय होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) अंशत: खरे आहे.

(५) लघु पाटबंधारे विभाग, भंडारा अंतर्गत सिंचन व्यवस्थापनाकरिता असलेल्या मामा तलावांच्या खोलीकरणाची कामे आवश्यकतेनुसार करण्यात आली असून यापुढे देखील आवश्यकतेनुसार खोलीकरणाची कामे करणे नियोजित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा जिल्ह्यातील खटाव माण तालुक्यातील जिहे कठापूर-उपसा सिंचन योजनेबाबत**

**(४१) २३४१७ (१४-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कायम दुष्काळी असणाऱ्या खटाव माण तालुक्यातील जिहे कठापूर-उपसा सिंचन योजनेला चालु वर्षातही फक्त ७० हजाराच्या किरकोळ निधीची तरतूद करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी २५० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) जिहेकठापूर- उपसा सिंचन योजनेकरिता सन २०१५-१६ करीता रु. एक लक्षची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

(२) शासनस्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बाभुळगांव (जि.यवतमाळ) बेंबळा प्रकल्पातून बिगर शेती**
**करीता पाण्याचे आरक्षण मिळण्याबाबत**

**(४२) २३४७६ (१७-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाभुळगांव (जि.यवतमाळ) बेंबळा प्रकल्पातून बिगर शेती करीता पाण्याचे आरक्षण ठेवण्यात आल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या कोणत्या प्रयोजनार्थ धरणाचे पाणी आरक्षित करण्यात आले आहे,

(३) बिगर शेती आरक्षण कायम ठेवल्यास प्रवाही सिंचनावर काही परिणाम होईल काय ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) बेंबळा प्रकल्पाच्या मंजूर मुळ प्रकल्प अहवालामध्ये बिगर सिंचनासाठीची तरतुद करण्यात आली आहे.

(२) प्रशासकीय मान्यता प्राप्त अहवालानुसार पाणी पुरवठा योजनेसाठी ३२.६४ द.ल.घ.मी. व धरणाचे खालील बाजूचे इकॉलॉजी वापराकरीता १०.०० दलघमी असे एकुण ४२.६४ दलघमी बिगर सिंचन पाणी वापरासाठी आरक्षित करण्यात आले आहे.

(३) प्रकल्प अहवालाप्रमाणे हे आरक्षण मंजूर असलल्यामुळे प्रवाही सिंचनावर परिणाम होणार नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यात तिरु प्रकल्पाच्या पाणी प्रमाणपत्राबाबत

**(४३) २३५८९ (१४-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील उदगीर तालुक्यात तिरु नदीवरील बॅरेजस मंजूर असून त्याचे पाणी प्रमाणपत्र उपलब्ध करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तिरु प्रकल्पाच्या पाणी प्रमाणपत्रासाठी प्रशासनाकडे लोकप्रतिनिधींनी वारंवार विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून पाणी प्रमाणपत्र मिळाले यासाठीचा प्रस्ताव नाशिकच्या महाराष्ट्र राज्य जलप्राधिकरण कर्यालयात प्रस्ताव दाखल करुन सुध्दा या विभागाकडून त्रुटी दाखवून प्रमाणपत्रासाठी अडचणी निर्माण करीत असल्यामुळे नागरिकांचा रोष वाढत असल्यामुळे या परिसरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पाणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) नाही.

(२) होय.

(३) लेंडी उपखोरे हे लवादाच्या मध्य गोदावरी उपखोऱ्यात समाविष्ट आहे. या उपखोऱ्यात लवादानुसार अनुज्ञेय पाणी वापराचे नियोजन पुर्ण झाले असल्याने, या खोऱ्यात प्रत्यक्षातील पाणी वापराचा अभ्यास करुन फेर नियोजन करण्याचे कारणास्तव तिरु नदीवरील बॅरेजेसचे पाणी उपलब्धता प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही.

(४) मध्य गोदावरी उपखोऱ्यातील प्रत्यक्ष पाणी वापराचा अभ्यास करुन मध्य गोदावरी उपखोऱ्यात नवीन प्रकल्पांसाठी १८.३३ TMC पाणी नियोजनास काही अटीच्या अधीन तत्तव:मान्यता दिली आहे. त्यानुसार तयार करण्यात आलेल्या मध्य गोदावरी उपखोऱ्याचे आराखड्यत लेंडी उपखोऱ्यातील तिरु नदीवरील तिरुका, सुल्लाळी (डोंगरगांव), मंगरुळ व गव्हाण या चार बंधाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत उपरोक्त आराखड्यातील योजनांची कामे जलसंधारण महामंडळामार्फत करावयाचे शासनास्तरावर ठरले आहे. त्यामुळे आराखड्यात समाविष्ट उपरोक्त चार बंधाऱ्यांची कामे हाती घेण्याचे दृष्टीने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करणे बाबतची कार्यवाही मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील मौजे राजेवाडी येथील शेतकरी जयसिंग नंदराम सुदर्डे यांच्या संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(४४) २३८१९ (१७-०८-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील मौजे राजेवाडी येथील शेतकरी जयसिंग नंदराम सुदर्डे यांच्या संपादित जमिनीचा मावेजा न दिल्यामुळे न्यायालयाच्या आदेशाने लघुपाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांची खूर्ची आणि अन्य काही साहित्य जप्त करण्यात आल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, जालना जिल्ह्यात माहे एप्रिल, २०१५ मध्ये अशा प्रकारे जप्तीची कार्यवाही करण्याची तिसरी घटना आहे, हे ही खरे आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय,

(२) राजेवाडी येथील जयसिंग नंदराम सुंदर्डे यांचा संपादित जमिनीचा मावेजा वेळेत अदा करता न आल्यामुळे १५ एप्रिल, २०१५ रोजी या प्रकरणात न्यायालयीन आदेशाद्वारे जप्तीची कार्यवाही झाली होती. या प्रकरणी देय वाढीव मावेजा दिनांक १७ जुलै, २०१५ अन्वये जिल्हा न्यायालयात जमा करण्यात आला आहे.

(३) माहे एप्रिल, २०१५ मध्ये जलसंपदा विभागांतर्गत वरील एकाच प्रकरणात जप्तीची कार्यवाही झाली आहे.

---

**उजनी हा आठमाही प्रकल्प असताना त्यातुन बारमाही उजवा व डावा कालव्यातुन पाणी सोडल्याने होत असलेले नुकसान**

**(४५) २३८३० (१७-०८-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरणातुन वर्षाला जवळपास १४ टिएमसी पाण्याचे बाष्पीभवन होते हे खरे आहे काय,

(२) बाष्पीभवन रोखण्याचे उपाय करण्याचा विचार शासनाने केला होता, हे खरे आहे काय,

(३) उजनी हा आठमाही प्रकल्प असताना त्यातुन बारमाही उजवा व डावा कालव्यातुन पाणी सोडले जाते हे खरे आहे काय,

(४) असल्यास, पाणी सोडल्याने होत असलेले नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) होय,

(२) नाही,

अशा प्रकारचे प्रयोग इतर लहान प्रकल्पावर केले असता. प्रचलीत बाष्पीभवन रोखण्याचे उपाय आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाहीत.

(३) अंशत: खरे आहे,

पाणी नियोजन बैठकीत ठरल्याप्रमाणे रब्बी हंगामात पाणी दिल्यानंतरही धरणात पाणी शिल्लक असल्यास, उन्हाळी हंगामाचे नियोजन करुन पाणी सोडण्याचा निर्णय घेतला जातो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टाकली कलान लघु पाटबंधारे (ता.भातकुली,जि.अमरावती) या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत**

**(४६) २४०५८ (१४-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी कलान लघु पाटबंधारे (ता.भातकुली, जि.अमरावती) या प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव दिनांक १६ मे, २०१५ च्या दरम्यान प्रधान सचिव (जसप्र व वि) यांचेकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) सिंचनाच्या क्षेत्रात महत्तम अनुशेष असलेल्या जिल्हयातील या प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेला तातडीने मान्यता प्रदान करावी या आशयाचे एक पत्र विधानसभा सदस्य, अमरावती यांनी दिनांक १ जून, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५)** :(१) होय,

(२) होय,

(३) शासन निर्णय दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ अन्वये विदर्भातील सिंचन प्रकल्पांना सुप्रमा देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार प्रकल्पास सुप्रमा प्रदान करण्याची कार्यवही महामंडळ स्तरावरुन येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानागड, जिल्हा-गोंदिया (मध्यम) प्रकल्पासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४७) २४०९६ (१४-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानागड, जिल्हा-गोंदिया (मध्यम) प्रकल्पासाठी लागणारा जलसंपदा विभागाकडे निधीसाठी बऱ्याचदा निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुनपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, त्यामुळे निधी अभावी सदर प्रकल्पाचे काम थांबलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे येथील शेतकरी यांना सदर मानागड मध्यम प्रकल्पाचा लाभ घेता आलेला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनामार्फत शेतकऱ्यांसाठी निधी केव्हापर्यंत मिळेल त्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

मानागड मध्यम प्रकल्प ता. सालेकसा जि. गोंदिया विशेष दुरुस्तीच्या रु. ९५९.६७३ लक्ष किंमतीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर निधी तरतूद करुन कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) नाही.

सद्य:स्थितीत मानागड मध्यम प्रकल्पावरुन पाणी उपलब्धतेनुसार सिंचन करण्यात येत आहे. प्रकल्पाची प्रकल्पिय सिंचन क्षमता १७०० हेक्टर असून सरासरी १०४० हेक्टर क्षेत्राला सिंचन करण्यात येत आहे.

(४) प्रशासकीय मान्यता प्रस्तावाची छाननी सुरु असुन त्यास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बारामती व फलटण तालुक्यांच्या सीमेवरुन वाहणाऱ्या निरा नदीवरील कांबळेश्वर येथील पाण्याने तुडुंब भरलेला बंधाऱ्याजवळ वाळू माफियांनी जिलेटिनचा स्फोट केल्याबाबत**

**(४८) २४११३ (१७-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारामती व फलटण तालुक्यांच्या सीमेवरुन वाहणाऱ्या निरा नदीवरील कांबळेश्वर येथील पाण्याने तुडुंब भरलेला बंधारा नक्षलवादी मानसिकतेच्या वाळू माफियांनी जिलेटिनचा स्फोट घडवून उडवून दिला असल्याची बाब माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास

आली, हे खरे आहे काय,

(२) त्यामुळे बंधारा लाभक्षेत्रातील पिके धोक्यात असून, शेतकरी संतप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) हे अशंत: खरे आहे,

पूर्ण बंधाऱ्याच्या एकूण ४२ स्तंभापैकी स्तंभ क्रं. ३० च्या उर्ध्व बाजुच्या दगडी गोलाकार भागास दिनांक २५ मे, २०१५ च्या मध्यरात्री सुमारास अज्ञात इसमांनी स्फोटाने नुकसान पोहचविले होते.

(२) नाही.

(३) पुणे पाटबंधारे विभागामार्फत दिनांक १ जून, २०१५ अन्वये पोलीस अधीक्षक ग्रामीण, सातारा यांना सदर घटनेबाबत कळविण्यात आले असून तसेच दिनांक २६ मे, २०१५ च्या एफ.आय.आर. अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे.

घटनेनंतर युध्दपातळीवर काम करुन बंधाऱ्यामध्ये पुन्हा बर्गे टाकून पाणीसाठी अडविला असून गळती थांबविण्यात आली आहे. त्यामुळे बंधाऱ्यावर अवलंबून असणाऱ्या सर्व पिकांना पाणी देता आले. तसेच सदर को.प. बंधाऱ्याच्या नुकसान झालेल्या भागाच्या दुरुस्तीचे आवश्यक ते सर्व काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुडूस गावाच्या हद्दीत कोकाकोला ही शीतपेय बनवणारी कंपनी वैतरणा बंधा-यातून दररोज लाखो लिटर पाणी वापरत असल्याबाबत**

**(४९) २४३७२ (१४-०८-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.काशिराम पावरा (शिरपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कुडूस गावाच्या हद्दीत कोकाकोला ही शीतपेय बनवणारी कंपनी असून या कंपनीला वैतरणा बंधा-यातून स्थानिक गावकऱ्यांच्या हक्काचे पाणी मागील अनेक वर्षापासून दिले जात असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील ३३ गाव पाड्यांत तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली असून कोकाकोला कंपनीचे पाईप लाईन याच गाव पाड्यामधून गेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-१०-२०१५) :**(१) नाही.

वाडा (जि.पालघर) को.प.बंधाऱ्याच एकूण २.०० द.ल.घ.मी पाणीसाठा आहे. यामधून कोकाकोला ही शीतपेय बनवणारी कंपनी एकूण ०.३७ द.ल.घ.मी. पाण्याचा वापर करते. बंधाऱ्याच्या उर्वरित पाणीसाठ्यातून बंधाऱ्याच्या तीरांवरील गावांना रब्बी व उन्हाळी हंगामात मागणीनुसार सिंचनासाठी पाणीपुरवठा करण्यात येतो.

(२) कंपनीची पाईपलाईन ज्या गावांमधुन वा पाड्यांमधून गेली आहे त्या गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झालेबाबत तहसीलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याकडून क्षेत्रिय कार्यालयास अवगत केलेले नाही. तसेच पाणी टंचाईमुळे टँकरने पाणी पुरवण्यासाठी जिल्हाधिकारी व तहसीलदार यांचेकडून लेखी अथवा तोंडी मागणी करण्यात आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे पुसद येथील अमडापुर लघु पाटबंधारे प्रकल्पावर कोट्यवधी रुपयांचा खर्च करुनही सिंचनाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(५०) २४५७५ (१४-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुसद (जि.यवतमाळ) अमडापुर लघु पाटबंधारे प्रकल्पाला सन १९८६ साली प्रशासकीय मान्यता मिळाली असून प्रकल्प बांधुन पुर्ण तयार असून या प्रकल्पावरुन १,७३७ हेक्टर सिंचन अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाकरीता कोट्यवधी रुपये खर्च होवुनही संबंधीत अधिका-यांच्या निष्क्रिय कार्यप्रणालीमुळे या प्रकल्पावरुन एक टक्काही सिंचन झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमरखेड तालुक्यातील आदिवासी बहूल क्षेत्रात मोठ्या प्रमाणात कोरडवाहू शेती करणारे शेतकरी व शेतमजुर आहेत. त्या शेतक-यांना कामाचा योग्य मोबदला मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आजही या प्रकल्पावर कार्यरत अधिकारी व कर्मचा-यांचे पगार मात्र नियमित सुरु असून प्रकल्पाच्या दुरावस्थेमुळे व अधिका-यांच्या अकार्यक्षमतेमुळे सिंचन मात्र शुन्य असल्यामुळे शासनाचे तिजोरीवर विनाकारण भुर्दंड पोचत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे,

अमडापूर लघु प्रकल्पास सन १९९१ साली प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तसेच दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी रु. ७१.७२ कोटी किंमतीस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) नाही.

मुख्य कालव्याच्या १४.७४ कि.मी. लांबी पेक्षा ९.० कि.मी. पर्यंत कालव्याचे काम पूर्ण झाले आहे. २०१३-१४ मध्ये १५२ हे. सिंचन करण्यात आले आहे.

(३), (४), (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) स्थानीक कास्तकारांच्या विरोधामुळे कालव्याचे काम पुर्ण होऊ शकले नाही. ३० जुन, २०१६ पर्यंत कालव्याची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.